जनसंपर्क कक्ष
शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर
17 JUL 2024
पुढारी

# राष्ट्रीय शैक्षणिक धोरणाच्या माध्यमातून जागतिक नागरिक घडविणे आवश्यक

## कुलगुरू डॉ. डी. टी. शिर्के यांचे प्रतिपादन

कोल्हापूर : पुढारी वृत्तसेवा

नवीन राष्ट्रीय शैक्षणिक धोरणाची प्रभावीपणे अंमलबजावणी करीत असताना कौशल्यधारक जागतिक नागरिक तयार करण्यासाठी सर्वांच्या विशेष प्रयत्नांची आवश्यकता आहे, असे प्रतिपादन शिवाजी विद्यापीठाचे कुलगुरू डॉ. डी. टी. शिर्के यांनी केले.

शिवाजी विद्यापीठांतर्गत राबविल्या जाणाऱ्या विविध विषयांच्या अनुषंगाने आयोजित महाविद्यालयातील प्राचार्यांच्या बैठकीत ते बोलत होते.

यावेळी डॉ. श्रीकृष्ण महाजन यांनी 'एनईपी'ची अंमलबजावणी करणे म्हणजे, फक्त ढाचा तयार करणे असे नाही. यामध्ये सगळ्यात महत्त्वाचा बदल म्हणजे परिणामाधारित शिक्षण राबविणे हा आहे. त्याद्वारे चॉईस बेसड् क्रेडिट सिस्टीम विद्यार्थ्यांना उपलब्ध करून देणे. नावीण्यपूर्ण शैक्षणिक पद्धतींचा अवलंब करून शिक्षकांच्या क्षमता वाढीसाठी विशेष प्रयत्न करणे गरजेचे आहे.

महाराष्ट्र राज्य कौशल्य विकास विभागातील अधिकारी आनंद

- शिवाजी विद्यापीठात प्राचार्यांची बैठक

मापुस्कर म्हणाले, ग्रामपंचायतींच्या ठिकाणी कौशल्य केंद्र असले पाहिजेत, यासाठी ५११ कौशल्य केंद्रे सुरू केलेली आहेत. १२० महाविद्यालयांपासून ही संख्या सुरू करून हजार महाविद्यालयांपर्यंत हे घेऊन जायचे आहे.

याप्रसंगी जिल्हा कौशल्य विकास मार्गदर्शन केंद्राचे सहायक आयुक्त संजय माळ, नवोपक्रम, नवसंशोधन व साहचार्य विभागाचे संचालक डॉ. सागर डेळेकर यांनी मार्गदर्शन केले.

प्र-कुलगुरू डॉ. प्रमोद पाटील यांनी स्वागत व प्रास्ताविक केले. याप्रसंगी कुलसचिव डॉ. विलास शिंदे, परीक्षा व मूल्यमापन मंडळाचे संचालक अजितसिंह जाधव, विद्यार्थी विकास विभागाचे संचालक डॉ. प्रकाश गायकवाड, डॉ. रामचंद्र पवार यांच्यासह कोल्हापूर, सांगली आणि सातारा जिल्ह्यांतील महाविद्यालयांचे प्राचार्य, शिक्षक मोठ्या संख्येने उपस्थित होते.

17 JUL 2024

पुण्यनगरी

जनसंपर्क कक्ष
शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर

# कौशल्यधारक जागतिक नागरिक घडवणे आवश्यक

## कुलगुरू डॉ. दिगंबर शिर्के यांचे प्रतिपादन

कोल्हापूर : प्रतिनिधी

नवीन राष्ट्रीय शैक्षणिक धोरणाची प्रभावीपणे अंमलबजावणी करीत असताना कौशल्यधारक जागतिक नागरिक तयार करण्यासाठी सर्वांच्या विशेष प्रयत्नांची आवश्यकता आहे, असे प्रतिपादन शिवाजी विद्यापीठाचे कुलगुरू डॉ. दिगंबर शिर्के यांनी केले. विद्यापीठांतर्गत राबवल्या जाणाऱ्या विविध विषयांच्या अनुषंगाने राजर्षी शाहू सभागृहामध्ये आयोजित केलेल्या महाविद्यालयातील प्राचार्यांच्या बैठकीत अध्यक्षस्थानावरून ते बोलत होते.



डॉ. श्रीकृष्ण महाजन म्हणाले, नवीन राष्ट्रीय शैक्षणिक धोरणाची अंमलबजावणी करणे म्हणजे फक्त ढाचा तयार करणे असे नाही. यामध्ये महत्त्वाचा बदल म्हणजे परिणामाधारित शिक्षण राबवणे आणि त्याद्वारे चॉईस बेसड् क्रेडिट सिस्टीम विद्यार्थ्यांना उपलब्ध करून देणे. नावीण्यपूर्ण शैक्षणिक पद्धतींचा अवलंब करून शिक्षकांच्या क्षमता वाढीसाठी विशेष प्रयत्न करणे गरजेचे आहे.

महाराष्ट्र राज्य कौशल्य विकास विभागातील अधिकारी आनंद मापुस्कर आचार्य चाणक्य कौशल्य केंद्राबाबत मार्गदर्शन करताना म्हणाले, ग्रामपंचायतींच्या ठिकाणी कौशल्य केंद्रे असायला हवीत. यासाठी ५११ कौशल्य केंद्रे सुरू केलेली आहेत. १२० महाविद्यालयांपासून ही संख्या सुरू करून हजार महाविद्यालयांपर्यंत हे घेऊन जायचे आहे. उच्च शिक्षण हे कौशल्यपूरक असले पाहिजे, यासाठी हे विशेष प्रयत्न केले जात आहेत.

याप्रसंगी जिल्हा कौशल्य विकास मार्गदर्शन केंद्राचे सहायक आयुक्त संजय माळ, डॉ. सागर डेळेकर यांनी मार्गदर्शन केले. प्र-कुलगुरू डॉ. प्रमोद पाटील यांनी प्रास्ताविक केले. याप्रसंगी कुलसचिव डॉ. विलास शिंदे, अजितसिंह जाधव, डॉ. प्रकाश गायकवाड, डॉ. रामचंद्र पवार यांच्यासह कोल्हापूर, सांगली आणि सातारा जिल्ह्यातील महाविद्यालयांचे प्राचार्य, शिक्षक उपस्थित होते.